# स्वातंत्र्यदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण



**पुणे / प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधान भवन येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतीनिधी, नागरिक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विनयकुमार चौबे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांच्यासह सैन्यदलातील अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात

### लिफ्टचा दरवाजा उघडा ठेवल्याच्या कारणावरून मारहाण

**बारामती :** लिफ्टचा दरवाजा उघडा ठेवल्याच्या कारणावरून वरच्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांनी मतिमंद मुलाला व त्याच्या आईला मारहाण केल्याने तिच्या डाव्या कानाचा पडदा फाटला आहे.या प्रकरणी बारामती शहर पोलिस ठाण्यात संगिता अंकुश झगडे, अंकुश झगडे (रा. खंडोबानगर, बारामती,जि.पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बारामती शहरातील चव्हाण इको व्हिलेज , खंडोबा नगर, बारामती येथे ही घटना घडली. येथील तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या संगिता अंकुश बुगडे व अंकुश झगडे यांनी लिफ्टचा दरवाजा उघडा ठेवल्याच्या कारणावरून मुलगा शुभम हा मतिमंद आहे हे माहीत असतानाही त्याला व त्याची आई यांना मारहाण केल्यामुळे त्यांना गंभीर दुखपत झाली असून त्यामुळे त्यांच्या डाव्या कानाचा पडदा फाटला आहे.या प्रकरणी फिर्यादी यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.पोलिसांनी १४ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस हवालदार ससाणे करत आहेत.

### आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन

**पुणे :** महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र ठरलेल्या परंतु आधार प्रमाणीकरण न झालेल्या शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना ७ सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आधार प्रमाणीकरण करण्यासाठी महा-आयटीमार्फत लघु संदेश देण्यात आला आहे. तसेच यासंदर्भात संबंधित सहकारी, राष्ट्रीयकृत बँकांनी देखील शेतकऱ्यांना व्यक्तीशः कळविण्याबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून सूचित करण्यात आले आहे.

लाभासाठी पात्र ठरलेले आणि त्याअनुषंगाने विशिष्ठ क्रमांक देण्यात आलेले, परंतु आधार प्रमाणीकरण झाले नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखेची संपर्क साधून आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असेही पुणे ग्रामीणचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था प्रकाश जगताप यांनी कळविले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभ वितरणाचा कार्यक्रम

लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाची भेट देण्यासाठी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री येणार

**पुणे / प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना'ही गरजू महिलांच्या घरसंसाराला हातभार लावणारी कल्याणकारी योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून आकाराला आली आहे. या योजनेच्या राज्यस्तरीय लाभ वितरणाचा कार्यक्रम मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या (दि. १७) शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे होणार आहे.

राज्य शासनाने महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबीकरण, आत्मनिर्भर करण्याबरोच त्यांच्या सशक्तीकरणाला चालना देण्याकरीता 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण'योजना सुरू केली आहे. राज्यातील बहिणींना रक्षाबंधनाची गोड भेट म्हणून रक्षाबंधनाच्या दोन दिवस अगोदरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणाऱ्या कार्यक्रमात महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील लाभ जमा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, महिला व बाल विकास मंत्री कु. आदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदींसह खासदार, आमदार, प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील १५ हजाराहून अधिक लाभार्थी प्रातिनिधीक स्वरुपात कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थींना रक्कम जमा केल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्यावेळी लाभार्थींसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, बैठक व्यवस्था, पार्किंग, महिलांना कार्यक्रमस्थळी आणण्याची व्यवस्था, त्यांची आरोग्य तपासणी, भोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी व्यवस्था चोख होतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

**पुणे जिल्ह्यातील ५ लाखावर महिलांच्या खात्यावर रक्कम जमा**

या योजनेंतर्गत पात्र महिलांना प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचा लाभ देण्यात येत असून जुलै आणि ऑगस्ट या दोन्ही महिन्यांचे एकत्रित ३ हजार रुपये लाभार्थी भगिनींच्या खात्यावर जमा होण्यास १४ ऑगस्टपासूनच सुरूवात झाली आहे. आजपर्यंत पुणे जिल्ह्यातील ५ लाखाहून अधिक लाभार्थी महिलांच्या बँक खात्यावर या योजनेची रक्कम जमा झाली आहे.

**बहिणींसाठी अखंड कार्यरत आहे यंत्रणा**

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'अंतर्गत सर्व पात्र महिलांना लाभ मिळेल, कोणीही पात्र भगिनी वंचित राहणार असे निर्देश दिले होते. त्यादृष्टीने जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या नेतृत्त्वाखाली जिल्हा प्रशासनाची सर्व यंत्रणा अखंड कार्यरत ठेवल्यामुळे राज्यात सर्वाधिक महिलांची नोंदणी पुणे जिल्ह्यात झाली आहे. राज्यात १ कोटी ५६ लाख ६१ हजार २०९ महिलांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी राज्यात सर्वाधिक पुणे जिल्ह्यातील ९ लाख ७४ हजार ६६ महिलांनी नोंदणी केली आहे.

प्रशासनाच्या गतीमानतेमुळे ऑनलाईनसह ऑफलाईन अर्ज स्वीकारणे, ऑफलाईन अर्ज ऑनलाईन पोर्टलवर भरणे, अर्जांची छाननी करणे आदींसाठी २४ बाय ७ तत्त्वावर काम केल्यामुळे ९९.५४ टक्के अर्जांवर निर्णय घेण्यात आला.

प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज तपासून तिला लाभ देण्याची प्रक्रिया लाभ मिळेपर्यंत सुरू राहणार आहे. योजनेचा लाभ हस्तांतर करण्यासाठी महिलांचे बँकखाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही प्रशासनाच्यावतीने सुरू असून सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. योजनेकरिता उर्वरित पात्र महिलांना ३१ ऑगस्टअखेर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**मंत्री कु. तटकरे आणि उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी घेतला तयारीचा आढावा**

उद्या होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने महिला व बाल विकास मंत्री कु. तटकरे आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी आज शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे भेट देऊन सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेतला. कार्यक्रमात येणाऱ्या महिलांची कोणतीही गैरसोय होणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांच्या प्रसिद्धीसाठी शिवाजीनगर येथे मेळाव्याचे आयोजन

**पुणे :** इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा दृष्टीकोनातून इतर मागास बहुजन विभागाच्यावतीने शिवाजीनगर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संचालक ज्ञानेश्वर खिलारी, सहसंचालक संतोष हराळे, प्रादेशिक उपसंचालक खुशाल गायकवाड, सहायक संचालक विशाल लोंढे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा. श्रीकांत देशमुख, कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या प्रायार्या डॉ. कल्याणी जोशी, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्सचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयातील शिष्यवृत्ती संदर्भातील कामकाज करणारे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. श्री. खिलारी यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आश्रमशाळा, भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आदी योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना कसा मिळेल यासाठी शिक्षण संस्थांनी प्रयत्नशील रहावे. तसेच विद्यार्थ्यांनीही या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. श्री. गायकवाड यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत थोडक्यात माहिती देवून विभागाचे पुढील ध्येय व धोरणाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. लोंढे यांनी, इतर मागास बहुजन कल्याण विभागातील विविध योजनांची माहिती पुस्तीका 'उत्कर्ष बहुजनांचा' याचा क्युआर कोड उपलब्ध करून देण्यात आला असून यामार्फत विभागाची माहिती पुस्तीका डाऊनलोड करून तळागळातील लोकांपर्यंत विभागाच्या योजनांचा प्रचार व प्रसार करावा, असे आवाहन केले.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**पुणे / प्रतिनिधी**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता अनुदान योजना, बीज भांडवल योजना व थेट कर्ज योजनेकरीता उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. थेट कर्ज योजनेअंतर्गत उद्दिष्टापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्यास लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

अनुदान योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा ५० हजार रुपयांपर्यंतची आहे. प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार रूपयांच्या मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करावयाची आहे.

बीज भांडवल योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा ५० हजार १ ते ५ लाख रूपयांपर्यंतची आहे. प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळाकडून ४ टक्के व्याजदराने देण्यात येते. या रकमेत महामंडळाच्या १० हजार रूपये अनुदानाचा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते. महामंडळाच्या व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार ३ ते ५ वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास ५ टक्के स्वत:चा सहभाग हिस्सा भरावयाचा असतो.

थेट कर्ज या योजनेमध्ये प्रकल्प मर्यादा १ लाख रूपयांपर्यंतची आहे. महामंडळाचा सहभाग ८५ हजार रुपये इतका असून अनुदान १० हजार रूपये आहे. अर्जदाराचा सहभाग ५ हजार रूपये आहे. कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यानुसार ३ वर्षात करावयाची आहे. कर्जावर ४ टक्के व्याजदर असेल.

जिल्ह्यातील इच्छुक नागरिकांनी लाभ घेण्याकरीता ु.पलीरहरशिळीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. भरलेल्या अर्जाची प्रत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं. १०३/१०४, मेंटल हॉस्पिटल कॉर्नर, येरवडा पुणे, दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०३०५८ येथे सादर करावी, असे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक सी. के. माने यांनी कळविले आहे.


**ग्रामपंचायत केसनंद,ता. हवेली, जि. पुणे.**

**खुली निविदा सुचना सन २४/२५ क्र. ३**

ग्रामपंचायत केसनंद हे खालील तपशीलाप्रमाणे कामाच्या निविदा नोंदणीकृत ठेकेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने दिनांक १७/०८/२०२४ ते २०/०८/२०२४ पर्यंत मागवित आहोत. सदर निविदा येणाऱ्या मासिक सभेत उघडल्या जातील. तसेच तपशील संबंधित ठेकेदार यांना मेल/पत्र/एस. एम. एस द्वारे कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | गायकवाड वस्ती येथे भुमिगत गटर लाईन करणे. | ४,२३,७२७/- | १% | ३ महिने |

**अटी:-** १) लिफाफा क्रमांक १ मध्ये रजिस्ट्रेशन, GST प्रमाणपत्र, इसारा रक्कमेचा चेक इ. कागदपत्रे असावीत. २) लिफाफा क्रमांक २ निविदा संचामध्ये दराचा उल्लेख असावा. ३) मुल्यांकन (एम.बी.) पूर्ततेनंतरच देयक अदा केले जाईल. ४) कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रा.पं.केसनंद, ता.हवेली जि पुणे.

सही/-
सरपंच
ग्रा.पं.केसनंद, ता.हवेली जि पुणे.



**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO : 2024_DOAWB_1071335_1**

***CONSTRUCTION OF PROPOSED ONION STORAGE SHED (2000MT)***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. *AAO SAI FARMERS PRODUCER COMPANY LIMITED AT ANAKWADE, TAL-NANDGAON, DIST – NASHIK*is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is ***Rs. 221.00 Lakhs (Including GST)***. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date for submission of online bid is **30/08/2024 up to 11.00AM**. Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist :- Nashik**



**ग्रामपंचायत निगडे, ता.मावळ, जि.पुणे**

**बी.-१ खुली निविदा सुचना ०२ सन २०२४-२५.**

ग्रामपंचायत निगडे ता.मावळ, जि.पुणे येथील खालील कामाची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांची मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहे. को-या निविदांचा नमुना ग्रा.पं.कार्यालय निगडे, ता.मावळ,जि.पुणे यांच्याकडुन दि.१७/०८/२०२४ ते दि.२४/०८/२०२४ रोजी (सकाळी १०:०० ते सायं ०५:०० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.१७/०८/२०२४ ते दि.२४/०८/२०२४ रोजी पर्यंत सायं ०४:०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कार्यालय निगडे, येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ०५:०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रू.GST वगळून | को-या निविदेची फी र.रू | इसारा र.रू. | काम पुर्ण करावयाचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे निगडे (भरत भागवत घर ते शांताराम शेजवळ घरा पर्यंत व इतर) येथे भूमिगत गटर करणे.(१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर २०२३-२४) | १,०५,६५४/- | १००/- | १०५६/- | ६ महिने |

**टिप:-१.**कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे.**२.**सदर निविदा मोहोरबंद लिफाफ्यामध्ये स्विकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.**३.**सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-१.नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३.आयकर प्रत ४.पॅनकार्ड.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत निगडे ता.मावळ,जि.पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत निगडे ता.मावळ,जि.पुणे



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 26.06.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. प्रिती आशिष सिंग 2. आशिष तारा प्रसाद कुमार | संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: - निवासी फ्लॅट क्रमांक 906, 26.99 चौ. मीटर (चटई क्षेत्र ) एक्झर्बिया आयफेल सिटी C5 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या नवव्या मजल्यावर 4.74 चौ.मी. गट क्रमांक 1527/2, 1447, 1448, 1450/1, 1526, 1450/2, 1451,1438, 1467, 1467, 1470, 1474, 1440, 1468, 1565, 1466, 1545, 1449, 1550, 1527/1, 1527/3, 1479, 1445, 1464, 1441, 1549, 1540, 1469, 1463, 1462, 1537, 1454, 1535, 1534, 1446, 1477, 1443, 1458, 1455, 1461, 1478, आणि 1525 आणि इतर गाव - चाकण तालुका - खेड जिल्हा पुणे महाराष्ट्र 410501 | PUNHL18001753 & PUNHL18001171 | 13 जून 2024 | रु 13,22,46/- | रु. 26,76,628.93 | रु. 13,22,460/- | सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून | 03-09-2024 सकाळी 10 ते दुपारी 12 |
| 1. भाग्यश्री बराटे 2. संदीप बराटे | संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: - फ्लॅट क्रमांक A5-213, संलग्न बाल्कनीसह 25.59 चौ.मी. चटई क्षेत्र मोजमाप 4.43 चौ.मी. एकूण क्षेत्रफळ 30.02 चौ.मी. "एक्झर्बिया अंबी", म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर मावळ गाव, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत - 410507 | H005352806201006 48/ H005352806201006 48L/ H005352806201006 48G | 13 जून 2024 | रु .1,23,714/- | रु. 28,81,527.09 | रु. 12,37,140/- | सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून | 03-09-2024 सकाळी 10 ते दुपारी 12 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 02/09/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 03/09/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 04/09/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात उदा., **नाव – शेखर काळे, एल&टी फायनान्स लिमिटेड, संपर्क क्रमांक 9823271111- आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं.177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतात. कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता ई-लिलाव बोली/ऑफर किंवा पुढे ढकलू शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 17.08.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✽ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com